NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

दिनांक ३०.१०.२०२६ शुक्रवार

(कामगिरी)

१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :–

दिनांक २९.१०.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०५ केसेसमध्ये ०६ ईसमावर कारवाई करून एकुण ३२,६९१/–रू. चा मुद्देमाल जप्त केला. तसेच, जुगार कायद्यान्वये ०२ केसेसमध्ये ०२ ईसमांवर कारवाई करून एकुण २,२२४/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच दिनांक २९.१०.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक ३०.१०.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये **कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये ०१ ईसमावर** कारवाई करण्यात आलेली आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये, ओव्हरस्पीड वाहन चालविणे कलम १८४ मोवाका २७ केस, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये ४३ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १३० मोवाका अन्वये १५० केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये २६९ केसेस, रॉग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये ९८ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये ६६ केसेस, ड्रायव्हींग विदाऊट युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये ४४ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये १७३ केसेस, धोकादायकरित्या बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका अन्वये ०२ केस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये १९ केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४ बी(१) मोवाका अन्वये ०४ केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये १,०४१ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे कलम १८४(सि) अन्वये ११ केस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये २२ केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण २,१०७ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. ९,०४,७००/–रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

२) गिट्टीखदान पोलीसांची कामगिरी :– शस्त्रासह धुमाकुळ घालणाऱ्या आरोपीस अटक.

दिनांक २९.१०.२०२६ चे १२.१० ते १२.२५ वा. चे दरम्यान, गिट्टीखदान पोलीसांचे पथक पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, गोरेवाडा रोडवरील दस्तरखान हॉटेल समोर एक इसम चाकु घेऊन धुमाकुळ घालत आहे. अशा मिळालेल्या माहितीवरुन, नमुद ठिकाणी गेले असता, तेथे एक इसम हातात चाकु घेऊन येणारे जाणारे लोकांना शिवीगाळी करतांना दिसुन आला. त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले व त्यास नि:शस्त्र केले. त्यास पंचासमक्ष नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव सैयद जामीन सैयद

जाहीद वय २२ वर्षे रा. प्लॉट क्र. २९, नजीर कॉलनी, बालाजी किराणा जवळ, बोखारा, कोराडी, नागपूर असे सांगितले. आरोपीचे ताब्यातुन एक लोखंडी चाकु कि. २००/— रु. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगुन धुमाकुळ घालतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती अन्नपुर्णा सिंग, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. २), मा. श्री शिवाजी गायकवाड, सहा. पोलीस आयुक्त (सदर विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. सारंग मिराशी, पोउपनि. आर. आर. जाधव, पोहवा. चंद्रशेखर यादव, विश्वास बलादे यांनी केली.

(गुन्हे)

१) पोलीस ठाणे वाडी :— हद्दपार ईसमास अटक.

दिनांक २९.१०.२०२६ चे २३.३० वा. चे सुमारास, वाडी पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत गुन्हेगारांचे शोधात पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, सोनबा नगर येथील न्यु स्टार पब्लीक शाळेजवळ एक हद्दपार इसम नामे अशोक निंबाळकर हा उभा आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन तेथे प्राप्त वर्णनाचा इसम दिसुन आला. त्याचे जवळ जात असता, तो पोलीसांना पाहुन पळु लागला. त्याचा पाठलाग करून, त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव अशोक उर्फ भोला मोहन निंबाळकर वय ४२ वर्षे, रा. प्लॉट क्र. ३८६, सोनबा नगर, वाडी, नागपुर असे सांगीतले. त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ०७/२०२५ दिनांक ०६.११.२०२५ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०१ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. रोशन फुकट यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाडी येथे मपोउपनि उमा कोटमे यांनी आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

२) पोलीस ठाणे कपिलनगर :— चोरी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

फिर्यादी वामन बाबुरावजी भगत वय ४६ वर्षे रा. प्लॉट नं. ३९४, ओमनगर, सक्करदरा, नागपुर यांची पोलीस ठाणे कपिलनगर हद्दीत, मौजा वांजरा उप्पलवाडी येथे करण कोठारी बिझनेस पार्क नावाचे बांधकाम साईट सुरु असुन तेथे बांधकामास लागणारे इलेक्ट्रीक तथा प्लंबीगचे साहित्य ठेवलेले होते. दिनांक २१.१०.२०२६ चे ०६.०० ते ०७.०० वा. चे दरम्यान, फिर्यादी व स्टोअर मॅनेजर राजीव लोचन मिश्रा वय ४२ वर्ष यांनी बांधकाम साईटवर पाहणी करीता गेले असता, तेथे ठेवलेले पॉलीकॅब कंपनीचे वेगवेगळया एमएमचे इलेक्ट्रीक वायर २० बंडल व प्लंबीगचे ब्रॉस वॉल ०४ नग असा एकुण किमती १,३६,७६६/— रु. चा मुद्येमाल कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याचे दिसुन आले. अशा फिर्यादी यांनी दिनांक २९.१०.२०२६ रोजी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कपिलनगर येथे सफौ. राजेश बांबोले ७७४५८७१३६३ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

३) पोलीस ठाणे गिट्टीखदान :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक २९.१०.२०२६ चे १५.४५ ते १६.०० वा. चे दरम्यान, फिर्यादी यांचा नातेवाईक नामे युवराज राजेंद्र मोहाडीकर वय २० वर्ष रा. राजेंद्र नगर, केडीके कॉलेज रोड, निलम पान शॉपचे बाजुला, लाईन क्र. १२ बी, नंदनवन, नागपुर हा व त्याचा मित्र नामे आशिष प्यारेलाल पटेल वय २२ वर्ष रा. जरीपटका, नागपुर हे दोघे

त्याचे ॲक्टिवा मोपेड क्र. एमएच ४९ एव्ही ८४५९ ने डबलसीट दहेगाव येथुन कॉलेजवरुन नागपूर कडे येत असतांना, पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत, नॅशनल झु पॉर्क समोरील रोडवर कोणत्यातरी अज्ञात वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे नातेवाईकाचे ॲक्टिवाला समोरुन धडक देवुन, गंभीर जखमी करुन घटनास्थळावरुन पळुन गेला. अपघातामध्ये फिर्यादीचा नातेवाईक गंभीर जखमी होऊन त्याचा मित्र किरकोळ जखमी झाला. जखमी यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी फिर्यादीचा नातेवाईक युवराज मोहाडीकर यास तपासुन मृत घोषीत केले. त्याचा मित्र आशिष पटेल याचा उपचार सुरु आहे.

याप्रकरणी फिर्यादी मोहनीश महादेवराव मोहाडीकर वय २८ वर्ष, रा. राजेंद्र नगर, केडीके कॉलेज रोड, निलम पान शॉपचे बाजुला, लाईन क्र. १२ बी, नंदनवन, नागपुर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे पोउपनि राहुल राठोड ८२०८१६४२२९ यांनी अज्ञात वाहन चालक आरोपीविरूध्द कलम २८१,१०६(१),१२५(अ) भा.न्या.सं. सहकलम १३४,१७७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. अज्ञात वाहन चालक आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

(अकस्मात मृत्यु)

पोलीस ठाणे यशोधरानगर :— दिनांक २९.१०.२०२६ चे १४.३० वा. चे सुमारास फिर्यादीचा मुलगा नामे मोहम्मद साकीब मोहम्मद जुम्मन वय २० वर्षे रा. प्लॉट क्र. ५३, इंदीरा गांधी नगर, अहमदभाई यांचे घराजवळ, यशोधरानगर, नागपुर हा पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीत, राजीव गांधी नगर, अहमदभाई यांचे घराजवळ शिडीवर चढुन प्लंबींगचे काम करीत असतांना, शिडीचा बाजुला असलेल्या ईलेक्ट्रीक डिपीला स्पर्श होऊन, त्यास इलेक्ट्रीक करंट लागुन तो जागीच जळुन मरण पावला. मृतदेह पुढील कार्यवाहीस्तव मेयो हॉस्पिटल येथे पाठविण्यात आला आहे.

अशा फिर्यादी मोहम्मद जुम्मन मोहम्मद कादीर अन्सारी वय ४९ वर्ष यांचे सुचनेवरून पोलीस ठाणे यशोधरानगर येथे सपोनि गजानन तेलरांधे ९८२२५२८५७५ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

स्वा/—
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.